# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयकुत्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४०८/२०२३ दिनांक — २८/११/२०२३

## नायगाव पोलीस ठाण्याचे हद्दिमध्ये अनोळखी इसमाचा निर्घृण खुन करणा-या अज्ञात आरोपीतांची तसेच मयताची ओळख पटवुन आरोपींना अटक गुन्हे शाखा- कक्ष २, वसई यांची कामगीरी.

दिनांक २२.११.२०२३ रोजी श्री पंकज आत्माराम मोरे हे त्यांचे मित्र विक्रम भंडारी याचे सोबत कामाचे निमित्ताने प्रवास करीत असताना बाफाने ब्रिज जवळ मोकळया जागेतील शेतात लघु शंकेला गेले असता त्यांना शेताच्या बांधावर झुडुपात उताणे स्थितीतील एक संपुर्ण कुजलेले पुरुष जातीचे अंदाजे २५ ते ३० वर्षे वय असलेले प्रेत दिसुन आले. त्यानंतर त्यांनी बाफाने पोलीस चौकी येथे जावुन पोलीसांना दिलेल्या खबरीव्दारे नायगाव पोलीस ठाणे अपमृत्यु ७२/२३ सी आर पी सी १७४ प्रमाणे सदरचा अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली. मा. वैदयकीय अधिकारी साो. जे. जे. रुग्णालय यांनी प्रेतावर शवविच्छेदन करुन मयताचे डोक्यास गंभीर दुखापतीमुळे मृत्यु झाल्याचा अभिप्राय दिला. त्यावरुन संबंधीत अ.मृ. चे तपासीक अंमलदार यांनी, दिनांक २२.११.२०२३ रोजीचे पूर्वी नायगाव पुर्व, मुंबई अहमदाबाद हायवेवर मोकळया शेतात अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन यातील मयताचे डोकयात दगड तसेच इतर कोणत्यातरी हत्याराने गंभीर दुखापत करुन त्याचा खुन केला व त्यानंतर पुरावा नष्ट करण्याचे उद्देश्याने प्रेत शेतालगत असलेल्या नाल्यामध्ये दाट झुडपात टाकुन पुरावा नष्ट केला असल्याबाबत सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नायगाव पोलीस ठाणे गु. रजी. नं. ४१०/२०२३ भादविस कलम ३०२,२०१ प्रमाणे दिनांक २४/११/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**सदर गंभीर स्वरुपाचा खुनाचा गुन्हा केल्यानंतर अज्ञात आरोपीने पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने निर्जन स्थळी टाकलेल्या मयताचे प्रेत पुर्णपणे कुजुन व सडून शरिरावरिल त्वचा गळुन हाडांचा सापळा दिसत असलेल्या अवस्थेत सापडलेल्या मयताची ओळख पटविणे आणि मारेक-यांचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणणे हे मि.भा.व.वि. पोलीसांसमोर मोठे आव्हान होते. दाखल निर्घृण खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत मा. वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक- शाहुराज रणवरे नेम- गुन्हे शाखा कक्ष - २ वसई यांनी वेगवेगळी पथके तयार करुन मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मनुष्य मिसींग चेक केल्या गेल्या. तसेच वसई, विरार, नालासोपारा, मुंबई, ठाणे परीसरात मयताचे फोटो व त्यांचे अंगावरील कपडे चिजवस्तु यांची भित्तीपत्रके बनवुन ते सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यात आली होती. त्यावेळी नायगाव पोलीस ठाणे मनिष्य मिसिंग रजि नं ७२/२०२३ मधील मिसिंग लवेश रमेश माळी वय २३ वर्ष रा. बीबी पाडा, कामण स्टेशन, कामण चौकीच्या मागे, नायगाव पुर्व ही व्यक्ती दिनांक ०८/११/२०२३ रोजी पासुन मिसिंग असल्याची माहीती प्राप्त झाली. सदर मिसिंग व्यक्तीचे अंगावरील कपडे व त्याचे मिसिंग होण्याचा कालावधी हे मयत इसमाचे कपडे व मरणाचे कालावधीशी मिळते-जूळते असल्याने सदर मयत इसमाचे प्रेतावरील कपडयांवरुन मयत इसमाची त्याचे नातेवाईकांकरवी ओळख पटविण्यात आली. सदर मयत व्यक्तीस अंमलीपदार्थाचे सेवनाची सवय असल्याने त्याचे सोबत नशा करणारे व्यक्तींबाबत तपास करुन त्यांची माहीती प्राप्त करण्यात आली. त्याच दरम्यान गुप्त बातमीदाराकरवी मयत लवेश रमेश माळी याचा त्याचे सोबत नशा करणारे मित्रांनीच ठार मारल्याची माहीती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार इसम वय ५० वर्ष रा. बाफाने चौकीच्या बाजुला, नायगाव पुर्व यास विश्वासात घेवून त्याचेकडे गुन्हयाचे बाबत चौकशी करुन खालील आरोपीतांची नाव निष्पन्न करण्यात आली.**

आरोपीतांची नावे पत्ते :-

१) एक पुरुष इसम वय ३० वर्ष रा. शांती गोविंद मार्ग आनंद निवासच्या बाजूला चंद्रपाडा, नायगाव

२) एक पुरुष इसम वय ३० वर्ष रा. बाफाने प्रविण पेंटरच्या जवळ, नायगाव पुर्व

३) एक विधीसंर्घषग्रस्त बालक रा. काशिमिरा

वरील प्रमाणे आरोपीतांची नावे निष्पन्न झाल्यानंतर सदर आरोपीतांचा शोध घेवून त्यापैकी आरोपीत एक पुरुष इसम वय ३० वर्ष रा. शांती गोविंद मार्ग आनंद निवासच्या बाजूला चंद्रपाडा, नायगाव यास ताब्यात घेण्यात आले. आरोपीताकडे गुन्हयाचे घडले प्रकाराबाबत कसुन चौकशी केली असता दिनांक ०८/११/२०२३ रोजी सदर गुन्हयातील मयत लवेश रमेश माळी याने ताब्यातील आरोपीत याची ॲटोरीक्षा क्रमांक एमएच/४८/बीएफ/२१३८ ही चालविताना ती डंपरला मागुन ठोकल्याने रीक्षाची काच फुटल्याने नुकसान केल्याने आरोपीताचा मयतावर राग होता. त्यानंतर मयत यांनी गुन्हयातील तिनही आरोपीत आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचेसोबत झोपडीमध्ये एकत्र नशा केली त्यावेळी विधीसंर्घषग्रस्त बालक याचे खिशातुन मयत लवेश रमेश माळी याने ५०००/-रुपये चोरल्याचा संशय घेवून वरील आरोपीत व विधीसंर्घषग्रस्त बालक यांनी मिळुन मयत यास ठोश्याबुक्कयांनी मारहाण करुन डोक्यात दगड घालून जिवे ठार मारुन त्याचे प्रेत पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने बाजुच्या झाडीझुडपात फेकुन दिले असल्याचे कबुल केले आहे.

गुन्हे शाखा कक्ष-२ वसई **यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नमुदचा गुन्हा घडले पासुन अथक व अविरतपणे सलग परीश्रम करुन पुर्णपणे कुजलेल्या मृतदेहाची ओळख पटवुन त्याचे मारेक-यांचा शोध घेवून गुन्हा उघडकीस आणला असुन सदर गुन्हाचा पुढील तपास नायगाव पोलीस ठाणेचे पोनि/ सागर टिळेकर नायगाव पो.स्टे. हे मा.वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.**

सदरची कारवाई मा.श्री अविनाश अंबुरे पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर प्रकाश शिंदे, स.फौ.रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. रविंद्र पवार, प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, दादा आडके, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, म.सु.ब. केकान,चौधरी सर्व नेम- गुन्हे शाखा-२ वसई, सहा.फौज- संतोष चव्हाण नेम- सायबर गुन्हे शाखा तसेच नायगाव पोलीस ठाण्याचे पो.नि.सागर टिळेकर, स.पो.नि. गणेश केकान, रोशन देवरे, पो.अं. सचिन खटाळ, चेतन ठाकरे, अमर पवार, जयवंत खांडवी, सचिन मोहीते यांनी केली आहे.

**----0000----**